दैनिक www.esuryodaylive.com
महाराष्ट्र
# सूर्योदय
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष ५ वे || अंक ८६ || रविवार १६ मार्च २०२५ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# चौकशी होऊनही त्या बोगस संस्थांवर कारवाई करण्यास दिरंगाई...

दै सूर्योदय/निश्चल येनोरकर ङ्गतुमसर दि१५:- ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन() च्या वतीने तुमसर तालुक्यातील सेवकराम पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हरदोली(सि.) व सीमा देवी पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसर या बोगस औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या () गैरप्रकाराविरुद्ध केलेल्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी संबंधित विभागाकडून होत असलेल्या दिरंगाईबद्दल ने प्रश्न उपस्थित करीत एका आठवड्यात कारवाई करून दोन्ही संस्थांची मान्यता रद्द करण्याची मागणी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी विजय लाकडे यांना करण्यात आली. लवकरच वरिष्ठांकडे निरीक्षणाचा अहवाल सादर करण्याचे आश्वासन लाकडे यांनी दिले.



तुमसर तालुक्यातील सेवकराम पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हरदोली(सि.) व सीमा देवी पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसर या दोन्ही संस्था बोगस असून शासनाच्या कोणत्याही निकषाचे पालन न करता आपल्या मनमर्जीप्रमाणे चालत असून दोन्ही संस्थांनी प्रशिक्षणार्थींना झीरो अटेंडन्टस् तत्वावर प्रवेश दिला आहे. अनेक प्रशिक्षणार्थी संस्थेत येत नाहीत ते दुसरीकडे नोकरी करतात किंवा इतर काम करतात. सदर संस्थांमध्ये च्या मार्गदर्शक तत्वानुसार कोणत्याही प्रकारच्या भौतिक सुविधा नाहीत. तसेच पात्र शिल्पनीदेशक सुध्दा नाहीत व जे आहेत ते पात्र नाही व पुरेसे सुध्दा नाहीत. अशा प्रकारची तक्रार दिनांक ०३/०२/२०२५ रोजी निवेदनाद्वारे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी भंडारा यांच्याकडे करण्यात आली होती व त्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत सदर संस्थांचे निरीक्षणही करण्यात आले. त्यात अनेक आक्षेपार्ह बाबी नोंदवण्यात आल्याची माहिती आहे. मात्र निरीक्षण होऊन एक महिना उलटूनही संस्थेवर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही आणि विभागामार्फत करण्यात आलेल्या निरीक्षणाचा अहवालही विद्यार्थी संघटनेला अजूनपर्यंत प्राप्त झाला नाही. यामुळे आतल्या-आत काय सुरू आहे हेच कळेना अस झालेले आहे,त्यामुळे विद्यार्थ्यांसह सर्वच घटच संभ्रमात आहेत.सदर विभागाकडून पारदर्शकता दिसत नसून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकाऱ्यांची व त्यांच्या प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचा गंभीर आरोप यावेळी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन कडून करण्यात आले आहे. निरीक्षणाचा अहवाल संघटनेला देण्याची व सदर संस्थांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी यावेळी संघटनेकडून करण्यात आली. जर मागण्या एक आठवड्यात पूर्ण झाल्या नाहीत तर ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन() च्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना एकत्र करून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व प्रशासनाविरुद्ध व्यापक व तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा यावेळी चे जिल्हा सचिव कॉम्रेड विश्वजित बनकर यांनी दिला.ङ्गङ्गयावेळी शिष्टमंडळामध्ये राज्याध्यक्ष कॉम्रेड वैभव चोपकर यांच्यासह जिल्हा कोषाध्यक्ष कॉ.निशिका उरकुडे,कॉ. क्रिश शेंडे, कॉ. सागर कारेमोरे, तृप्ती तिडेश्वर,राकेश बडोले ,निशा धांडे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

## गट ग्राम पंचायत किन्ही मोखे येथे स्वामित्व योजना सनद वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

दै सूर्योदय/निश्चल येनोरकर

भंडारा दि१५; महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कृती आराखड्यातील ७ कलमी कार्यक्रमांतर्गत गट ग्राम पंचायत किन्ही मोखे येथे स्वामित्व योजना सनद वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.ङ्गङ्गसदर कार्यक्रम उप अधीक्षक भूमि अभिलेख, साकोली अनिल फुलझेले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्राम पंचायत सरपंच . घनश्याम पारधी व इतर पदाधिकारी यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. सौ. अश्विनी मांजे (उपविभागीय अधिकारी, साकोली) आणि श्री. निलेश कदम (तहसीलदार, साकोली) यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमामध्ये नागरिकांना हक्काची सनद वितरित करण्यात आली.ङ्गङ्गनागरिकांना हक्काची सनद मिळाल्याने आनंदाचे वातावरणङ्गङ्गया कार्यक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांच्या घरे आणि मोकळ्या भूखंडांचे अधिकार अभिलेख आणि प्रमाणभूत नकाशे तयार करण्यात आले. उपविभागीय अधिकारी,मांजे तहसीलदार कदम आणि उप अधीक्षक भूमि अभिलेख फुलझेले यांच्या हस्ते नागरिकांना अधिकार अभिलेख सनदा वाटप करण्यात आले. तसेच, नागरिकांच्या महसूल आणि भूमि अभिलेख विभागाशी संबंधित समस्यांवर चर्चा करून त्यांचे निराकरण करण्यात आले.ङ्गङ्गड्रोन मोजमापाद्वारे पारदर्शकतेला चालनाङ्गङ्गभूमि अभिलेख आणि महसूल विभागाच्या सहकार्याने, गावठाणातील मिळकती, घरे, मोकळे भूखंड आणि शासकीय जमिनीचे ड्रोनद्वारे अचूक मोजमाप करण्यात आले. परिणामी, सर्व मिळकतींचे अधिकार अभिलेख-सनदा उपलब्ध होऊन त्या अधिकृतरित्या वितरित केल्या गेल्या.ङ्गङ्गस्वामित्व योजनेचे बहुमोल फायदेङ्गङ्गनागरिकांना त्यांच्या मिळकतीवर बँकेकडून कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर झाला असून बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच, मालकी हक्क व हद्दीशी संबंधित वाद सोडविण्यास मदत होईल. शासनाच्या गृहनिर्माण योजनांचा लाभ नागरिकांना मिळू शकेल आणि खरेदी-विक्री व्यवहारात पारदर्शकता वाढेल. सरकारी जमिनीचे संरक्षणही अधिक प्रभावीपणे करता येईल.ङ्गङ्गगावाच्या सर्वांगीण विकासास चालनाङ्गङ्गस्वामित्व योजनेमुळे गावाच्या पत आणि विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नागरिकांचा विश्वास आणि आर्थिक स्थैर्य वाढणार असून गावाचा सर्वांगीण विकास साध्य होईल.ङ्गङ्गकार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्राम पंचायतच्या वतीने सरपंच श्री. घनश्याम पारधी यांनी उपस्थित नागरिक, पदाधिकारी आणि प्रशासनाचे आभार मानले.



## क्रांतिवीर बाबुराव शेडमाके यांचा लढा ब्रिटिश सत्ता व भांडवली सरंजामशाही विरोधात होता.-बाबारावजी मडावी

मनोज राऊत /जिल्हा प्रतिनिधी

यवतमाळ- १२ मार्च जंगोम दलाची स्थापना करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारे अवघ्या २५ वर्षात वंचित शोषितांच्या हक्कांसाठी व स्व शासनासाठी लढा देणारे १८५७ लढ्याचे आद्यक्रांतिकारक बाबुराव शेडमाके यांचा ज्वालाग्राही लढा ब्रिटिश सत्ता व भांडवली सरंजामशाही विरोधात होता.असे दुसऱ्या सत्रातील अध्यक्षीय भाषणात प्रख्यात साहित्यिक, आकांतकर बाबारावजी मडावी यांनी सांगितले. क्रांतिकारक बाबुराव शेडमाके चौक चौसाळा रोड वाघापूर येथे क्रांतिवीर गोंड राजे बाबुराव शेडमाके उत्सव समिती च्या वतीने १९२ जयंती निमित्त ११ ल १२ मार्च ला दोन दिवसीय कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सकाळी नेत्ररोग तपासणी शिबिर घेण्यात आले व दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात कार्यक्रम घेण्यात आला व सायंकाळी एकल व सामुहिक गोंडी नृत्य स्पर्धा घेण्यात आली तर दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात बाबुराव शेडमाके जयंती साजरी करण्यात आली भिमालपेन पेनठाना येथून बाबुराव शेडमाके यांची शोभायात्रा काढण्यात आली नंतर समाज प्रबोधन करण्यात आले.तलाव फैल येथून सुद्धा बाबुराव शेडमाके रॅलीचा समारोप झाला. दुसऱ्या सत्रात मान्यवरांचे सत्कार व एकल व सामूहिक गोंडी नित्य स्पर्धा बक्षीस देण्यात आले.डॉ हर्षल येरकाडे यांनी १५० नेत्ररोग तपासणी केली. यावेळी प्रा. वसंतराव पुरके,डॉ बाबा येलके हस्ते नरेश उईके मुख्य प्रवर्तक बाबुराव शेडमाके चौक यांचा सत्कार करण्यात आला. ङ्गकार्यक्रमात तहसीलदार मोरे साहेब,प्रा प्रविण देशमुख,नारायणराव मरस्कोल्हे,मुरलीधर टेकाम, प्रल्हाद सिडाम,प्रमोद घोडाम, मिनाक्षी वट्टी,गुलाबराव कुडमेथे,गुलाबराव मेश्राम,राजु चांदेकर,नरेश गेडाम,देवेंद्र चांदेकर,विनोद मडावी,किशोर उईके,प्रा.निनाद सुरपाम, विलास कन्नाके, सुधाकर मसराम,मनिषा तिरणकार ,रेखा कन्नाके, सुरेश वेलादे ,राहुल कन्नाके,आकाश आतराम तथा स्वागताध्यक्ष चंद्रशेखर मडावी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मिनल मनोज वाढवे व सुनिता दत्ताजी कुळसंगे यांचा विर पत्नी सांत्वन सत्कार करण्यात आला तर डॉ किरण अमोल वट्टी,शुभम रमेश कुडमेथे, कशिष नरेश उईके, यांचा विषेश प्राविण्य मिळवल्या बदल तर बालुभाऊ वट्टी यांचा तलाव फैल रॅली प्रमुख म्हणून सत्कारकरण्यात आला. ङ्गसांस्कृतिक कार्यक्रम परिक्षक पवनकुमार आतराम, पुंडलिक वर्म, लक्ष्मणराव कुळसंगे, बाबारावजी कुळसंगे होते. ङ्गसुत्रसंचलन कैलास मडावी, वंदना मडावी,अरविंद मडावी यांनी तर आभार योगिता मडावी,गजानन कोटनाके यांनी केले.कार्यक्रमाच्यायशस्वीतेसाठी बाबुराव शेडमाके उत्सव समिती अध्यक्ष दिलीप मसराम,सचिव निकिताताई उईके, गुलाबराव घोडाम अजय उईके,दिलीप शेडमाके संगिताताई मेश्राम,पुष्पा धुर्वे,सुनिताकुमरे,रेखाकुडमेथे,ज्योती मडावी,भारतगेडाम,गुणवंत शेडमाके,उमेश मेश्राम,सचिन कोवे, सुरेश मडावी यांनी केले असे प्रसिद्ध प्रमुख कृष्णा पुसनाके यांनी कळविले.



## औरंगजेबाची कबर ही मावळ्यांच्या शौर्याचे प्रतीक आहे, त्यामुळे ते काढू नका : रोहित पवार

छत्रपती संभाजी नगर येथे औरंगजेबाची कबर आहे. ही कबर हलविण्यावरून सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. याबाबत आज अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे पत्रकारांशी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले की, औरंगजेबाची कबर सर्व जाती धर्मातील मावळ्यांच्या पराक्रमाच्या शौर्याचे प्रतीक आहे. एवढा बलाढ्य औरंगजेब २७ वर्ष या महाराष्ट्रामध्ये बलाढ्य सेनेसह राहिला.मात्र त्याला छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा महाराष्ट्र जिंकता आला नाही अखेर एवढा शक्तिशाली श्रीमंत औरंगजेब फक्त कबरी पुरताच शिल्लक राहिला.

आणि हा पराक्रम सर्व मावळ्यांचा आहे . असे रोहित पवार म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की रयतेचे राज्य व्हावे, स्वराज्य स्थापन व्हावे यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या महाराष्ट्रातील सर्व समाजाचे जाती-धर्माची मावळे आपले प्राण पणाला लावून लढले. जय पवार यांच्या साखरपुड्याबाबत प्रश्न विचारताच भडकले शरद पवार संभाजी महाराज यांनी एक आदर्श येथील जनतेसमोर निर्माण केला. आणि औरंगजेब हा एक बलाढ्य व शक्तिशाली राजा जो २७ वर्षे या राज्यामध्ये जिंकण्यासाठी थांबला. त्याचे अनेक सरदार सैनिक नातेवाईक मारले गेले. आणि खऱ्या अर्थानं मावळ्यांनी पराक्रमाची शर्त केली. यामुळे औरंगजेबाची साम्राज्य अखेर एका गबरी पुरते मर्यादित राहिले. आणि ती कबर हीच खऱ्या अर्थानं सर्व मावळ्यांच्या पराक्रमाचे प्रतीक आहे. पराक्रमाची साक्षा आहे. जर औरंगजेबाची ही कबर काढली तर उद्या काहीजण हा इतिहास बदलतील.

संपादकीय

## समस्या केवळ

एक बरे झाले, भारतीय 'खात्या पित्या घरचे' आहेत, यावर आता 'लॅन्सेट'च्या अहवालानेच शिक्कामोर्तब केले. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचे स्वप्न पूर्ण होईल तेव्हा होईल, पण सध्या तरी आपण जगातले दुसऱ्या क्रमांकाचे (१८ कोटी) स्थूलराष्ट्र ठरलो आहोत. त्यात आपण महासत्ता अमेरिकेलाही (१७ कोटी २० लाख) मागे टाकले आहे. आता आपल्यापुढे केवळ चीन आहे (४० कोटी). किमान या क्षेत्रात आपण आपल्या शेजाऱ्याला यातल्या काही निकषांवर तरी लवकरच धूळ चारू, अशी शक्यताही या अहवालाने वर्तवली आहे. २०५० पर्यंत भारतातील एकतृतीयांश लोकसंख्या स्थूलतेचा सामना करत असेल, असा इशाराही हा अहवाल देतो. त्यामुळेच स्थूलता ही आपल्याला समस्या वाटत नसली तरीही ती गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

स्थूलता ही शारीरिक समस्या असली, तरी भारतात तिचे मूळ मानसिकतेत दडलेले आहे. आपण पिढ्यानपिढ्या स्थूलतेला समृद्धीचे लक्षण मानत आलो, मात्र ही समस्या केवळ पोषणातिरेकातून उद्भवलेली नाही. चुकीचा आहार आणि बेजबाबदार जीवनशैली ही त्यामागची मूळ कारणे आहेत. शिवाय ही तथाकथित समृद्धीही सर्वत्र समप्रमाणात विभागलेली नाही. तसे नसते, तर आज देशात सरकार अन्नधान्य मोफत वाटत असूनही ३५.५ टक्के बालकांची वाढ खुंटली नसती आणि ३२.१ टक्के बालकांचे वजन मानकांपेक्षा कमी भरले नसते. केवळ कर्बोदके म्हणजे संपूर्ण आहार नाही आणि जनतेचे पोट भरले म्हणजे इतिकर्तव्य पार पडले, असेही नाही हे आता सरकारला स्वीकारावे लागेल.

भारतात पीक-पाणी आणि ऋतुमानात एवढे वैविध्य आहे की काय, किती, कधी खावे याचे विशिष्ट सूत्र असणे शक्य नाही. पण खाद्यासंस्कृतीत विविधता असली, तरी आरोग्याचे तीन तेरा वाजवण्याच्या इच्छेत मात्र देशभर एकात्मकता दिसते. घरकाम, शेतावरचे काम, धावपळ हे सारे काही व्यायाम या शीर्षकाखाली मोजून समाधानी राहण्याची वृत्ती सार्वत्रिक आहे. शरीरातील प्रत्येक सांध्याला, स्नायूला, हृदयाला, मेंदूला योग्य प्रकारे, योग्य प्रमाणात आणि पुरेसा काळ चालना मिळाली, योग्य आहार आणि विश्रांती मिळाली, तरच व्यायामाचा खरा लाभ मिळतो. आठ तास संगणकासमोर आणि उरलेला वेळ मोबाइलसमोर अशी बैठी जीवनशैली आजच्या स्थूलतेच्या उद्रेकामागचे महत्त्वाचे कारण आहे. मात्र जिथे शाळेपासूनच शारीरिक शिक्षणाचा तास हा इतर विषयांचा अभ्यास संपवण्यासाठी आहे, असे बिंबविले जाते, त्या देशातील नागरिकांकडून एवढी अपेक्षा कुठे करणार? व्यायामाला प्रोत्साहन देण्याचे आपले सरकारी प्रयत्न नाक्यानाक्यांवर उभारलेल्या आणि बहुतेकदा सहा महिन्यांत निरुपयोगी ठरणाऱ्या तकलादू खुल्या व्यायामशाळांपलीकडे जात नाहीत. खेळाचे मैदान या शीर्षकाखाली राखीव ठेवलेल्या जागांवर सहज अतिक्रमणे होतात. सायकल किंवा जॉगिंग ट्रॅक हे केवळ पालिकेच्या निवडणुकीवेळी जाहीरनाम्यात दिसतात. गल्ल्याही पार्किंगने गिळंकृत केलेल्या असतात आणि पदपथ तर फेरीवाल्यांसाठीच बांधले जातात. जिम वा स्पोर्ट्स क्लबचे सदस्यत्व ज्याला परवडते, त्यालाच व्यायामाचा हक्क, असेच एकंदर धोरण दिसते. अर्थात इच्छाशक्ती असणारे अशा प्रतिकूलतेवर मात करण्याचे मार्ग शोधून काढतात. मात्र, त्यांचे प्रमाण अत्यल्पच!

मानसिकतेतली आणखी एक त्रुटी म्हणजे जे जे परदेशी ते उत्तम, हा समज. विविध देशांची खाद्यासंस्कृती जाणून घेणे चांगलेच. पण तो आहार तेथील स्थानिक परिस्थितीतून पुढे आलेला असतो. केवळ चविष्ट आणि स्वस्त आहे, म्हणून ते रोजच्या आहारात आणणार असू, तर त्याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. पोहे, उपमा, इडली, पराठ्यांऐवजी रोज सकाळी सीरियलची पाकिटं दुधाच्या वाडग्यात रिती केली तर गडबड होणार, हे निश्चित.

बहुराष्ट्रीय कंपन्या बाकी भारताविषयी काहीही म्हणोत, पण आपल्या जाहिरातविषयक धोरणांवर त्या बेहद्द खूश असणार. कारण अमुक एक पावडर दुधातून दिली की मुले ताडमाड वाढतील, शीतपेय प्राशनाने मरगळलेला माणूस धावत सुटेल, तमुक बाबाचे मिश्रण चमचाभर खाल्ले की स्मरणशक्ती वाढेल, या छापाच्या जाहिराती इथे सहज खपून जातात. गुटख्यापासून मद्यापर्यंत साऱ्याला अन्य उत्पादनांआडून सहज प्रसिद्धी देता येते. पाकीटबंद पदार्थांतील घटक लिहिताना लबाडी केली, तरी आकाश कोसळत नाही. माध्यमक्रांतीपूर्वी या पाकीटबंद पदार्थांचा उच्छाद शहरांपुरताच सीमित होता. आता मात्र गावांतल्या दुकानांतही चिप्सच्या पाकिटांच्या माळा झरझर संपतात आणि शीतपेयांच्या बाटल्या रित्या होतात. वडे, समोसे, चायनीजचे लोण खेडेगावांतही पोहोचले आहे. परिणामी गावांतही स्थूलता वाढल्याचे राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य अहवाल स्पष्ट करतो.

# उध्दर येथील पेशवेकालीन श्री रामेश्वर देवालयाचा इतिहास उजेडा उत्तर कोकणच्या इतिहासाचे पुनरावलोकन

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक/मंगेश यादव: कोकण इतिहास पत्रिका २०२५ मध्ये इतिहास संशोधक संदीप मुकुंद परब यांचा ''पेशवेकालीन सुधागड तालुक्यातील मौजे उध्दर येथील श्री रामेश्वर देवालयाचे बांधकामकर्ते इनामदार वेदमूर्ती शिवरामभट चित्राव - एक अभ्यास'' हा शोधनिबंध प्रकाशित झाला आहे. या लेखात त्यांनी वेदमूर्ती शिवरामभट चित्राव यांचे कार्य आणि मौजे उध्दर येथील रामेश्वर देवालयाच्या बांधकामाशी संबंधित ऐतिहासिक माहिती दिली आहे.ङ्ग या लेखामध्ये परब यांनी श्री रामेश्वर देवालयाच्या बांधकामात वेदमूर्ती शिवरामभट चित्राव यांचे योगदान आणि त्यांचा ऐतिहासिक महत्त्व याचे विवेचन केले आहे. या लेखाच्या माध्यमातून उत्तर कोकणच्या इतिहासाचे पुनरावलोकन करण्यात आले आहे. आणि विविध ऐतिहासिक पुरावे आणि साधनांची माहिती दिली आहे.ङ्ग संदीप परब यांनी सांगितले की, या देवालयावरील वेदमूर्ती शिवरामभट चित्राव यांच्या नावासंबंधी शिलालेखाचे नव्याने वाचन केले असून सदर शिलालेख हा देवालयाच्या निर्मितीसंदर्भातील एक अस्सल लिखित साधन असल्याचे परब म्हणाले. ङ्गऐतिहासिक माहिती व पुरावेङ्गलेखामध्ये गणो गबाजी तबीब यांच्याशी संबंधित मातोश्री जिजाबाई साहेब यांचे पत्र, सिद्दी याकूत कडून मिळालेल्या अंदाजे २००० एकर डोंगराची सनद आणि त्याच्या इंग्रजी भाषांतरासह त्यांच्या वंशज इनामदार आनंदीबाई वसंतराव लोणकर व विद्यमान वंशज धनोत्तम लोणकर यांच्याकडून देवस्थान ट्रस्टच्या नावे हस्तांतरित केलेली जमिनीची माहिती त्यांच्या छायाचित्रासह दिली आहे.ङ्गशिवरामभट चित्राव यांनी बांधकाम केलेली देवालये ङ्गशिवरामभट चित्राव हे एक उत्तम बांधकामतज्ञ होते. आणि त्यांनी अनेक देवालये बांधली. पुण्याचा नागेश्वर, केदारेश्वर, आणि रायगड जिल्ह्यातील उद्धर रामेश्वर ही देवालये त्यांनी बांधली. उद्धरचा रामेश्वर हे मंदिर शके १६६५ म्हणजेच इ. स. १७४३ मध्ये बांधले. थोरले बाजीराव यांनी शनिवारवाडा बांधण्यासाठी काही काम शिवरामभट चित्राव यांना दिले होते. शिवरामभट यांनी पुण्याच्या गणेशखिंडीतले गणपती मंदिर बांधले व पाषाणच्या शिवलिंगाची पुनः प्रतिष्ठापना केली. त्यांचे सर्वांत स्मरणीय काम पुण्यातील ओंकारेश्वराचे विशाल देवालय होय, जे त्यांनी सुरू केले आणि त्यांच्या पुत्र कृष्णभट यांनी पूर्ण केले. ङ्गअज्ञात माहिती उजेडात ङ्गइतिहास संशोधक संदीप मुकुंद परब यांनी लिहिलेला हा लेख उत्तर कोकणच्या इतिहासाशी संबंधित महत्त्वाच्या आणि अज्ञात माहितीचे पुनरावलोकन करत आहे. संदीप परब यांनी या लेखासाठी प्राप्त केलेली कागदपत्रे, पुरावे आणि इतर माहिती मिळवताना धनोत्तम लोणकर,सुभाष मानकर , विकास लहाने, दिपक पटेकर, गणेश रघुवीर व जयवंत जाधव यांचे आभार मानले आहेत.ङ्गसन्यासी जीवन ङ्गशिवरामभट चित्राव यांनी आयुष्यातील अखेरचे क्षण संन्यास घेतलेले जीवन जगत व्यतीत केले. दिनांक १५ एप्रिल ,१७५१ रोजी पाषाण येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीचे स्थान पाषाण येथील सोमेश्वर मंदिराच्या परिसरात समाधी स्वरूपात जतन केले आहे.





**पाली, ऐतिहासिक श्री रामेश्वर मंदिर.पाली, शिवरामभट चित्राव याचे पूर्वज गणो गबाजी तबीब यांच्या संबंधित मातोश्री जिजाबाई साहेब यांचे पत्र छायाचित्र पाली, शिवरामभटचित्राव यांच्या समाधीचे छायाचित्र. पाली, शिवरामभट चित्राव यांच्या वंशज इनामदार आनंदीबाई लोणकर व धनोत्तम लोणकर यांचे छायाचित्र. पाली, इतिहास संशोधक संदीप परब**

# टोळीयुद्धातून खून प्रकरणातील आरोपी दोन वर्षानंतर गजाआड

पुणे : शिवाजीनगर भागातील मंगला चित्रपटगृहासमोर टोळीयुद्धातून तरुणाचा खून करुन पसार झालेल्या दोन वर्षानंतर अटक करण्यात आली. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केल्यानंतर आरोपीने पोलिसांना गुंगारा दिला होता. त्याच्याकडून दोन पिस्तुले आणि चार काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.




पंडीत अण्णा कांबळे (वय २९, रा. ताडीवाला रस्ता, पुणे स्टेशन) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. अल्पवयीन असताना कांबळे याने एका तरुणाचा खून केला होता. यापूर्वी पिस्तूल विक्री प्रकरणातही त्याला अटक करण्यात आली होती, अशी माहिती परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिली.


कांबळे आणि साथीदारांनी टोळीयुद्धातून मंगला चित्रपटगृहासमोर १५ ऑगस्ट २०१३ रोजी नितीन मोहन म्हस्के (वय ३५, रा. ताडीवाला रस्ता) याच्यावर कोयत्याने वार करून निर्घृण खून केला. या गुन्ह्यात शिवाजीनगर पोलिसांनी १७ आरोपींना अटक केली होती. याप्रकरणी पोलिसांनी 'मकोका' कारवाई केली. कारवाई केल्यानंतर तो पसार झाला होता. गेले दोन वर्ष पोलीस त्याच्या मागावर होते. कांबळे हा दत्तवाडी परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडून दोन पिस्तुले आणि चार काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, गुन्हे शाखेचे निरीक्षक चंद्रकात सूर्यवंशी, उपनिरीक्षक अजित बडे, हवालदार रुपेश वाघमारे, भाऊ चव्हाण, प्रमोद मोहिते, राजकिरण पवार, महावीर वलटे, अतुल साठे, सचिन जाधव, प्रवीण दडम, सुदाम तायडे, श्रीकृष्णा सांगवे यांनी ही कारवाई केली.

फरार झाल्यानंतर कांबळे गोवा, कर्नाटकात नाव बदलून वास्तव्य करत होता. तो मोबाइल वापरत नव्हता. त्यामुळे त्याचा ठावाठिकाणा लागत नव्हता. तो परराज्यात लुटमारीचे गुन्हे करायचा. नागरिकांकडील मोबाइल संच चोरून तो नातेवाईकांशी संपर्क साधत होता. त्यामुळे त्याचा ठावठिकाणा लागत नव्हता. त्याच्याविरुद्ध यापूर्वी खूनाचे दोन, तसेच गंभीर स्वरुपाचे चार गुन्हे दाखल आहेत. ताडीवाला रस्ता, बंडगार्डन रस्ता, दत्तवाडी, दांडेकर पूल परिसरात तो गुन्हे करत होता.

# कल्याण तहसीलदार कार्यालय चालू पण कर्मचारी वेळेवर नाहीत, पण पंखा लाईट चालू,नागरिकांचे अनेक हेलपाटे -संदीप नाईक (निर्भय महाराष्ट्र पार्टी) - कल्याण विभाग

दै.सूर्योदय.कल्याण,(प्रतिनिधी) : कल्याण तालुक्यातील तहसीलदार कार्यालय १०:१५ झाले तरी कर्मचारी कामावर नाही.लाईट,पंखा मात्र चालूच.एकीकडे वीज वाचवाङ्गम्हणून स्वतः नागरिकांना संदेश देत आहे पण मात्र प्रशासन हलगर्जीपणा करताना दिसत आहे.




लाखांच्या पुढे पगार, सरकारी सुविधा,आठवा वेतन आयोग पण मिळणार परत नोकरीची सुरक्षा. मग कामावर वेळेवर का येत नाही.? प्रशासन गतिमान होण्याऐवजी त्यात शिथिलता आली आहे. खडवली या ठिकाणी भातसा नदीच्या किनारी घाटची तरकद करण्यात यावी याबाबद निवेदन अर्ज देण्यासाठी संदीप नाईक (निर्भय महाराष्ट्र पार्टी ) - कल्याण विभाग गेले असता सदर प्रकार त्यांना दिसून आले आहे. कोणत्याही सरकारी कार्यालयात सकाळी पावणेदहा वाजता ते संध्याकाळी साडेपाच वाजता पर्यंतची वेळ पाळली जात नाही.ङ्गबहुतांश जनतेची कामे ही गाव पातळीवरील ग्रामपंचायत, पोलिस ठाणे, तलाठी, सहकारी सोसायटी तर तालुकास्तरावरील तहसीलदार कार्यालय, प्रांत कार्यालय, पंचायत समिती, नगर परिषद अशा अनेक कार्यालयात होत असतात. मात्र या कार्यालयात कर्मचाऱ्यांची उपस्थिती वेळेवर दिसून येत नाही. काही कार्यालयात बायोमॅट्रिक मशीन नावापुरती लावलेले आहेत.ती कोणी पाहत ही नाही. बहुतांश कार्यालयात कर्मचारी सकाळी ११ वाजता नंतरच येत असतात. काही कर्मचारी संध्याकाळी चार, साडेचार वाजता निघून जातात; तर शनिवार, रविवारी सुट्टी असल्याने लांबचे कर्मचारी शुक्रवारी दुपारी निघून जातात. त्यामुळे दुर्गम भागातून अव्वाच्या सव्वा भाडे खर्च करून येणाऱ्या लोकांना अनेक हेलपाटे मारावे लागतात.ङ्गङ्गनागरिकांची तर म्हणच आहे सरकारी काम आणि १२ महिने थांब.सरकारी कर्मचारी ऑफिसमध्ये लेट,आयडेंटिटी कार्ड गळ्यात ठेवायचं नाही, गुंडागर्दी करायची, उलट उत्तर द्यायचे. वरून खोटे ३५३ आणि ३५४ दाखल करण्यासाठी शहाजोगपणाने पोलीस स्टेशनमध्ये जायचं.हा सरकारी नोकरांचा हल्ली रिवाजच झाला आहे.महिला कर्मचारी अधिकारी जर असेल तर हे सर्रास होत आहे.संदीप नाईक (निर्भय महाराष्ट्र पार्टी) - कल्याण विभाग वतीने निषेध.

# सिंहगड सोलापूरमध्ये काँक्रीट मिक्स डिझाईन कार्यशाळा

सोलापूर. : एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्याल आणि अल्ट्राटेक सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सिव्हिल इंजिनिअरिंगच्या . विद्यार्थ्यांसाठी काँक्रीट मिक्स डिझाईन या विषयावर एक दिवसीय प्रायोगिक कार्यशाळा पार पडली. ङ्गङ्गही कार्यशाळा एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात पार पडली. सकाळी १० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५ वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यशाळेला वेगवेगळ्या डिप्लोमा आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यशाळेत काँक्रीट मिक्स डिझाईनच्या तांत्रिक बाबी, योग्य मिश्रणाचे प्रमाण, प्रत्यक्ष मिक्स डिझाईन तयार करणे, तसेच त्याचा परीक्षक आणि बांधकाम क्षेत्रातील महत्त्व याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. अल्ट्राटेक सिमेंटचे तज्ञ अभियंता बाळकृष्ण कुलकर्णी आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.ङ्गया कार्यशाळेचे संयोजन प्रा. वाय. एन. बनसोडे यांनी केले. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि बांधकाम क्षेत्रातील नवीन संकल्पनांची माहिती मिळावी, या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेबद्दल समाधान व्यक्त केले असून, अशा प्रकारच्या उपयुक्त कार्यशाळांचे आयोजन वारंवार व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.या उपक्रमासाठी प्राचार्य. एस डी नवले आणि कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे मार्गदर्शन लाभले.



# न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतील १२२ कोटी अपहार प्रकरण : अखेर आरोपी गुजरातमध्ये सापडला

मुंबई : न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतील १२२ कोटींच्या अपहार प्रकरणातील आरोपी कपिल देढियाला आर्थिक गुन्हे शाखेने गुजरातमधून अटक केली. गैरव्यवहारातील १२ कोटी रुपये आरोपीच्या खात्यात जमा झाल्याचा आरोप आहे. याप्रकरणी आरोपीला शनिवारी न्यायलयापुढे हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला १९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. ही याप्रकरणातील पाचवी अटक आहे.




न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेतील अपहारातील रक्कम कपिल देढिया याच्या बँक खात्यात जमा झाली होती. त्याला अटक करण्यात आली. वडोदरा येथे शोधमोहिम राबवून त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याला शनिवारी मुंबईत आणण्यात आले आणि सकाळी ११.३० वाजता औपचारिकपणे अटक करण्यात आली. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायलायने आरोपीला १९ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. तपासानुसार, त्याच्या खात्यात अपहारातील १२ कोटी जमा करण्यात आले होते. याप्रकरणातील आरोपी मनोहर अरूणाचलम याच्या अटकेनंतर देढिया गायब झाला होता. त्याचा शोध घेण्यासाठी तीन पथके राजस्थान व गुजरातमध्ये पाठवण्यात आली होती. अखेर पोलिसांनी त्याला वडोदरा येथे ताब्यात घेतले. आतापर्यंत या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यात बँकेचे महाव्यवस्थापक हितेश मेहता, बांधकाम व्यावसायिक धर्मेश पौन, बँकेचे सीईओ अभिमन्यू भोअन, मनोहर उन्नाथन यांचा समावेश आहे.याशिवाय याप्रकरणात हिरेन भानू, गौरी भानू, उन्ननाथन अरूणाचलमसह देढियालाही आरोपी करण्यात आले आहे. या चौघांविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी करण्यात आल्या होत्या. भानू दाम्पत्याने अपहारातील सुमारे २८ कोटी प्राप्त केल्याचा संशय असून ते विदेशात असल्याचा संशय व्यक्त करण्यात येतो. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने आरोपी महाव्यवस्थापक हितेश मेहताच्या मालमत्तांची माहिती घेण्यास सुरूवात केली आहे. तपासाअंती त्यांच्यावर टाच आणण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात मेहता आणि मनोहरच्या काही व्यवहारांची माहिती मिळाली होती. त्यामध्ये २० लाखांचा व्यवहारही निदर्शनास आला होता. तसेच ट्रस्टच्या माध्यमातून पैसे फिरविण्याचाही बनाव असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अद्याप मनोहरकडून कुठल्याही ट्रस्टची माहिती देण्यात आलेली नाही. मनोहर व त्याचे वडील अरूणाचलम यांनी अपहारातील ४० कोटी घेतले. त्यापैकी ७ कोटी मेहताला दिले होते. उर्वरित ३३ कोटी विविध मार्गाने वळविल्याचा संशय आहे. मनोहरने काही मित्रांना पैसे पाठविल्याची माहिती मिळाली आहे. २०१९ मध्ये मेहताने मनोहरला १५ कोटी दिले. त्यानंतर १८ कोटी रुपये त्याच्या कार्यालयात स्वीकारल्याचेही तपासात उघड झाले आहे. याप्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.

## अर्थसंकल्प

कोणत्याही अर्थसंकल्पातील सविस्तर तपशील कळायला काही काळ जावा लागतो. कागदपत्रे, आकडेवारी यांच्या जंजाळाचा अर्थ लावण्यास थोडा वेळ लागतो आणि हा तपशील लगेच उपलब्ध होतो असेही नाही. अर्थसंकल्पाच्या दिवशी दिशा तेवढी कळते. त्या दिशेने तपशिलाचे बोट धरून पुढे गेल्यावर मार्गावरील खाचखळगे अधिक ठसठशीतपणे दिसतात. महाराष्ट्राचा सोमवारी सादर झालेला अर्थसंकल्प यास अपवाद नाही. निवडणूकपूर्व रमण्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीस लागलेली गळती लक्षात घेता या अर्थसंकल्पात खर्चाचे अधिक काही साहस केले जाणार नाही, हे अर्थसंकल्पाचे सादरीकरण होत असतानाच लक्षात आले होते. अर्थसंकल्पाचे वार्तांकन त्या समजावर आधारित असणे साहजिक. राज्यावरील कर्जाचा 'वाढता वाढता वाढे' असा वाढत चाललेला बोजा, भांडवली खर्चास कात्री लावण्याची आलेली वेळ, स्थानिक अस्मितांचा विचार करून आणखी काही स्मारकांची उभारणी इत्यादी तपशीलही अर्थसंकल्पदिनी कळून गेला. तथापि यानंतर मिळालेल्या तपशिलानुसार अर्थसंकल्पातील काही मुद्द्यांबाबत विरोधाभास दिसून येतो. तो दाखवून देण्यासाठी हा प्रपंच.

पहिला मुद्दा विजेच्या वाहनांवर थेट सहा टक्के कर प्रस्तावित करण्याचा. जगात सध्या वारे वाहात आहेत ते ही विजेवर चालणारी वाहने अधिकाधिक स्वस्त कशी होतील त्यासाठी प्रयत्न करण्याचे. इतके दिवस केंद्रानेही या वाहनांची निर्मिती, त्यासाठी लागणाऱ्या विजेऱ्या आदींवर सवलतींची खैरात केली. असे असताना महाराष्ट्र सरकार मात्र विजेवर चालणाऱ्या मोटारींवर अतिरिक्त कर आकारू पाहते त्याची संगती लागत नाही. याचे कारण जगातील या क्षेत्रातील बलाढ्य 'टेस्ला' भारतात पाऊल टाकू इच्छित असून त्यांचे पहिले विक्री केंद्र मुंबईतच येऊ घातले असल्याचे वृत्त आहे. तसे असेल तर हा कर या वाहनांच्या प्रसारास मारक ठरेल. अर्थात या विजेवरील वाहनांचे फार कोडकौतुक करू नये अशीच भूमिका 'लोकसत्ता' आतापर्यंत घेत आलेला आहे. शहरांतील पर्यावरण स्वच्छ राहावे यासाठी विजेवरील वाहनांचा प्रसार करायचा आणि त्यांच्यासाठी लागणारी वीज कोळसा जाळून दूर खेड्यात तयार करायची हा यातील दुटप्पीपणा. 'लोकसत्ता'ने तो वारंवार दाखवून दिला. तेव्हा या वाहनांस सवलती द्या, असे 'लोकसत्ता' मुळीच म्हणत नाही. म्हणणे इतकेच की या मुद्द्यावर अन्य राज्ये आणि केंद्र सरकार यांच्या धोरणांशी सुसंगत महाराष्ट्राचा हा करप्रस्ताव नाही. सरकारच्या प्राथमिक निवेदनानुसार हा कर ३० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतींच्या वाहनांवर लावला जाईल. हे ठीक. पण 'टेस्ला' वा 'बीवायडी' या कंपन्यांच्या वीज मोटारींची किंमत एक कोटी वा ५० लाखांपासून सुरू होते. आपल्याकडेही अनेक कंपन्यांच्या मोठ्या वीज मोटारींच्या किमती ३० लाख रुपयांपेक्षा अधिक आहेत. तेव्हा हे सारे करजाळ्यात येणार आणि वीज मोटारींचा प्रसार मंदावणार. याच्या बरोबरीने 'द्रवीभूत नैसर्गिक वायू' (सीएनजी) या इंधनावर चालणाऱ्या मोटारींवरही कर वाढवला जाणार आहे असे अर्थसंकल्प म्हणतो. हे पर्यावरणस्नेही इंधन अलीकडे चांगलेच लोकप्रिय होऊ लागले असून खासगी मोटारीही अनेक जण या इंधनावर चालणाऱ्या घेतात. नवी दिल्ली हे एके काळी अत्यंत प्रदूषित शहर होते. अजूनही तसे आहेच. पण त्या शहरातील प्रदूषण कमी करण्यात या इंधनावरील मोटारी आणि सार्वजनिक सेवेतील वाहने यांचा मोठा वाटा आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सबब राज्य सरकारचा या इंधनावरील करवाढीचा अर्थसंकल्पीय निर्णय सद्या:स्थितीत उफराटा वाटतो.

हा अर्थसंकल्प एका कोणत्या घटकाभोवती फिरला असेल तर तो म्हणजे 'लाडकी बहीण' योजना. या योजनेतून दरमहा दिली जाणारी रक्कम १५०० वरून २१०० केली जाणार अशी टूम होती. निवडणुकांआधी विद्यमान सत्ताधाऱ्यांनी तसे आश्वासन दिले होते. पण सत्ता मिळाल्यावर पैशाचे सोंग फार काळ निभावता येणार नाही, हे लक्षात आल्यावर ही रक्कम आहे तितकीच राखण्याचा निर्णय सरकारने घेतला. तो योग्यच. या योजनेपोटी राज्य सरकारच्या तिजोरीस दरसाल किमान ३६ हजार कोटींचे खिंडार पडणार असे अर्थमंत्र्यांनी केलेल्या निवेदनातूनच स्पष्ट होते. या बहिणींना दरमहा १५०० रु. ओवाळणी घरबसल्या मिळणार असेल तर ती मिळो बापडी! इतरांस त्यामुळे पोटदुखीचे कारण नाही. तथापि या ३६ हजार कोटी रुपयांची तुलना केली जावी ती अन्य महत्त्वाच्या घटकांवर सरकार आगामी वर्षात किती खर्च करू इच्छिते या रकमेशी. ती तशी केल्यास या सगळ्याचा अन्वयार्थ सुभगपणे लागेल. म्हणजे असे की राज्यातील जवळपास १२-१३ कोटी नागरिकांच्या आरोग्य रक्षणार्थ राज्य सरकार खर्च करणार फक्त ३८२७ कोटी रु., वैद्यकीय शिक्षणावरील स्वतंत्र खर्च यात मिळवल्यास ही रक्कम २५१७ कोटींनी वाढते. याचा अर्थ दोन्हीही मिळून ही रक्कम होते ६३४४ कोटी रु. इतकी. वास्तविक राज्यातील विविध रुग्णालयांतील निवासी डॉक्टरांची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यांची निवासस्थाने, कार्यालयीन सोयीसुविधांचा अभाव त्यांना राज्यातील केविलवाणे विद्यार्थी ठरवतो. पण त्यांच्यासाठी अधिक खर्च करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. तरीही राजकीयदृष्ट्या निकडीच्या बहिणींवर होणारा खर्च मात्र या रकमेच्या तब्बल सहापट. दुसरी तशीच बाब शिक्षणाची. या अर्थसंकल्पात शालेय शिक्षणासाठीची तरतूद आहे जेमतेम २९५९ कोटी रुपये इतकी आणि उच्च व तंत्र शिक्षण आदींसाठी अधिक ३०९८ कोटी रुपयांची भर त्यात घातली तरी ही रक्कम ६०५७ कोटी रुपये इतकी भरते.

# रायगड : वरंध घाटात एसटी बस दरीत कोसळली, १५ प्रवासी जखमी!

अलिबाग : सुनेभाऊ येथून महाडच्या दिशेने येणारी एसटी बस शनिवारी ५० फूट दरीत कोसळली. ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात झाला. या अपघातात १५ प्रवासी



जखमी झाले आहेत. भोर महाड मार्गावर वरंध घाटात एसटीला हा अपघात झाला. वरंध गावच्या जवळ असलेल्या एका तीव्र वळणार असतांना हा अपघात झाला. बसचे ब्रेक निकामी झाल्याने, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले,

बस वळणावर असतांना कलंडली. रस्त्याला घासत सुमारे ५० फूट खोल दरीत कोसळली.ङ्गङ्गसुदैवाने या दुर्घटनेत जिवीत हानी झाली नाही. मात्र बस मधील १५ प्रवासी जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच, स्थानिक पोलीस, बचाव पथके घटना स्थळी दाखल झाली. त्यांनी बस मधील प्रवाश्यांना बाहेर काढले. त्यांना उपचारासाठी महाड येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

पुणे आणि रायगड जिल्ह्यांना जोडणाऱ्या वरंध घाटाचे राष्ट्रीय महामार्ग पेण विभागाच्या वतीने नुकतेच काम करण्यात आले आहे. वरंध घाट ते रायगड जिल्हा हद्द या दरम्यान संरक्षक भिंत आणि रस्ता दुपदरीकरणाचे काम करण्यात आले आहे.

अरुंद रस्ता आणि खोल दरी असल्याने या ठिकाणी काम करणे आव्हानात्मक ठरत असल्याने हे रुंदीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या वर्षी काही महिने या मार्गावरील वाहतूक बंद करून ठेवण्यात आली होती. हे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक सुरू करण्यात आली होती. धोकादायक वळणे कमी करणे, संरक्षक भिंती उभारणे या सारखी कामे करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहनांचा वेग मात्र वाढला आहे. मात्र यामुळे चालकांची बेपर्वाई वाढली असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
सूर्योदय
रविवार १६ मार्च २०२५



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# भाजपमधून माथेरानचे संतोष कदम यांची मनसेमध्ये पुन्हा घरवापसी

कर्जत :जयेश जाधव

काही महिन्यांपूर्वी मनसे मधून भाजपमध्ये गेलेले माथेरानचे मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते संतोष कदम हे पुन्हा मनसे स्वगृही परतले.ङ्ग सन्मानीय राज ठाकरे यांचा विचारांनी सन्माननीय नेते अमित ठाकरे यांचा मार्गदर्शखाली मनसे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा नेतृत्वाखाली, जिल्हा उपाध्यक्ष सचिन कर्णुक कर्जत तालुकाध्यक्ष अध्यक्ष यशवंत भवारे जिल्हा सचिव अक्षय महाले , जयवंत कराळे जिल्हा संघटक वाहतूक सेना, सुरज कळंबे माथेरान शहर अध्यक्ष विद्यार्थी सेना यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश कार्यक्रम संपन्न झाला.ङ्ग यावेळी संतोष कदम यांच्यासह संतोष केळगणे, पप्पू भाई खान, शैलेश सोबत, आसिफ खान, रवी कदम, किसन चौधरी, अंजली केळगणे, सीमा कदम यांच्यासह असंख्य सहकारी यांचा मनसे पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला या सर्वांचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी स्वागत केले.



# बहुजन हितवर्धक कला संस्थेच्या वतीने कोकणरत्न पुरस्कार २०२५ चे आयोजन

मुंबई / प्रतिनिधी

बहुजन हितवर्धक कला संस्था यांच्या वतीने प्रत्येक वर्षी देण्यात येणारा, सन्मानाचा कोकणरत्न पुरस्कार.. सोहळा रविवार दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी मुंबईतील बौद्धजन पंचायत समिती सभागृह परेल येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर पुरस्कार सोहळ्याचे वितरण बौद्धजन पंचायत समितीचे सभापती सन्मा. आनंदराज आंबेडकर साहेब बहुजन हितवर्धक कला संस्थेचे संस्थापक, आणि सूरज म्युझिक कं. चे मालक प्रदीपजी खेत्रे आणि सार्वभौम वृत्त पत्र यांचे संपादक सन्मा. प्रेमरत्न चौकेकर साहेब, जेष्ठ साहित्यिक कोकणरत्न राष्ट्रपाल जी सावंत यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद.

सन्मा. कोकणरत्न मंगेशजी जाधव भूषविणार आहेत. या वर्षीचा कोकणरत्न पुरस्कार२०२५ नाथा जाधव , जनिकुमार कुमार कांबळे, अशोक अभंगे , इकबाल शर्फ मुकादम , अनंत गमरे , विजय जाधव , अनिल जाधव या मान्यवर मंडळीला देण्यात येण्यात आहे.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष गमरे आणि अमरदीप जाधव करणार असून सरचिटणीस शिवाजी मोहिते दिनेश सावंत, संदीप सकपाळ आणि सर्व कार्यकारिणी यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे

# पोफळी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे सामूहिक वार्षिक वाढदिवस उत्साहात साजरे

परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित प्राथमिक शाळा पोफळीत




आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांचे सामूहिक वार्षिक वाढदिवस हा उपक्रम शालेय शिक्षक व सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात,आनंदात पार पडला.यासाठी वाढदिवसाची सुबक रांगोळी , रांगोळी भोवती मेणबत्ती यांची उत्तम रचना आणि फुग्यांची मांडणी करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे सर्व विद्यार्थी रंगीत ड्रेस परिधान करून आले होते.कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील शिक्षिका सौ.साधना गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत करून तसेच वाढदिवसाचे महत्त्व आणि आपण तो वाढदिवस का साजरा करतो याची माहिती देऊन केली.तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन वाढदिवसानिमित्त एक छान संकल्प करण्याचे सुचविले त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे शाळेतील शिक्षिका यांनी औक्षण केले. मार्च महिन्यात वाढदिवस असणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे बोलाऊन त्या सर्वांकडून एकत्रितरीत्या केक कापून घेण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यानंतर वाढदिवसाच्या गाण्यावर विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवत , ठेका धरत छान नृत्य केले. नृत्यानंतर विद्यार्थ्यांचे वाढदिवसाच्या सुबक रांगोळी भोवती वर्गावर्गानुसार छान रचनेने फोटो काढण्यात आले.ङ्ग कार्यक्रमाची सांगता सर्व विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून केक व चॉकलेट्स देऊन करण्यात आली. प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांचे सामूहिक वार्षिक वाढदिवस हा उपक्रम मोठ्या उत्साहात, आनंदात यशस्वीरित्या पार पडला.

# रायगड सम्राट तृतीय वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न



कर्जत (जयेश जाधव) शंकर वायदंडे संपादित रायगड सम्राट न्यूज वेब पोर्टलच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त विशेषांकाचा प्रकाशन आणि रायगड सम्राट पुरस्कार वितरण सोहळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आज (१५ मार्च) मोठ्या उत्साहात नवीन पनवेल येथे संपन्न झाला.

यावेळी रायगड सम्राटचा गान सम्राट पुरस्कार प्रसिद्ध गायक रवींद्र जाधव, उद्योग रत्न पुरस्कार प्रयाग बिल्डरचे प्रदीप भोपी, समाजरत्न पुरस्कार मेहबूब याकूब शेख, उत्कृष्ट निवेदक म्हणून प्रवीण मोहोकर, तर क्रीडा क्षेत्रासाठी उत्कृष्ट कबड्डीपटू कु. तेजस्विनी इंगोले हिला पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

नील हॉस्पिटलच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्यास या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, डॉ शुभदा निल, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, निलेश सोनवणे, भाजपा नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा नेते प्रतीक बहिरा, भारत भोपी, पत्रकार मयूर तांबडे, संतोष भगत, गणपत वारगडा, संतोष आमले, संतोष सुतार, अनिल कुरघोडे, आप्पासाहेब मगर, रवींद्र पाटील, अण्णासाहेब आहेर,अक्षय कांबळे सचिन भोळे, विजय इंगोले,अशोक आखाडे, विशाल सावंत मुकुंद कांबळे, कैलास नेमाडे, अक्षय भगत आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी यांनी रायगड सम्राट चे कौतुक करत तृतीय वर्धापन दिनानिमित्त संपादक शंकर वायदंडे यांना शुभेच्छा दिल्या तसेच शंकर वायदंडे रायगड सम्राट च्या माध्यमातून समाजाचा आरसा समोर ठेवत असून समाजाला दिशा देण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत पुरस्कार प्राप्त मानकरींचे अभिनंदनही केले.

# आरोग्य विषयक विशेष जनजागृती व्याख्यान संपन्न

चिपळूण प्रतिनिधी
प्रदीप पवार

रत्नागिरी जिल्ह्यातील सुप्रसिद्ध राजाराम शिंदे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय पेढांबे ता. चिपळूण जिल्हा रत्नागिरी येथे आरोग्य विषयक , प्रथमोपचार व रस्ते वाहतूक सुरक्षा याविषयी विशेष जनजागृती व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल शिरगावचे डॉ.विशाल पेटकर, अभियांत्रकी महाविद्यालयाचे प्राचार्य नलावडे सर, प्राध्यापक बांदेकर सर




, झगडे सर, सरफले सर, आदी शिक्षक , इतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ फाउंडेशन व हॉस्पिटल च्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती देण्यात आली. व्याख्यानाचे अतिशय सुंदर नियोजन राजाराम शिंदे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्याकडून करण्यात आले होते.

# अपरांत हॉस्पिटल च्या डेंटल विभागाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा...!

अपरांत हॉस्पिटल हे नेहमीच नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून ते चिपळूण येथे आपल्या रुग्णांना उपलब्ध करुन देण्यासाठी अग्रेसर राहिलेले आहे.आताही सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की अपरांत हॉस्पिटल मधील डेंटल विभागाचे प्रमुख डॉ.प्रवीण दाभाडे आणि डॉ . सविता दाभाडे यांचे द्वारे अपरांत हॉस्पिटलच्या डेंटल विभागा ने आणखी एक पाऊल पुढे टाकत नेहमी प्रमाणेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली आहे .

आता कंटाळवाण्या वाटणाऱ्या जुन्या पद्धतीच्या दाताचे माप घेण्याच्या प्रक्रियेला निरोप देऊन तंत्रज्ञानाचे डिजिटल इंट्राओरल स्कॅनर हे दुर्मिळ असणारे अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान त्यांनी आपल्या डेंटल विभागामध्ये उपलब्ध केले आहे. ह्या तंत्रज्ञानामुळे माप घेणे , दातांना क्लिप न लावता अलायनार ट्रीटमेंट, डिजिटल इम्प्लांट प्लॅनिंग इ. क्लिष्ट वाटणाऱ्या दंत उपचार पद्धती सहज सुलभ आणि कमी वेळात पूर्ण होणार आहेत. तंत्रज्ञानावर चालणारे हे नवीन स्कॅनर निश्चितच पेशंटच्या उपचारासाठी उपयुक्त ठरते. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपचाराचा वेळ कमी होतो.मागील पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधी मध्ये अपरांत हॉस्पिटल वर विश्वास ठेवून असंख्य रुग्णांनी उपचार करून घेतले. रुग्णांचा हाच विश्वास हॉस्पिटलला अद्ययावत करण्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.आमचे रुग्ण, हितचिंतक, कुटुंबीय तसेच आमची सहाय्यक टीम या सर्वांचेच आम्ही शतशः ऋणी आहोत.आपला विश्वास व प्रेम आहेच. ते वृद्धिंगत होवो ही परमेश्वर चरणी प्रार्थना...अपरांत हॉस्पिटल ङ्गडेंटल विभाग.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )